**महाराष्ट्र शासन**
**ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य,**
**नगर भवन, मुंबई -४०० ००१**

## राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठानअंतर्गत ४८ व्या ग्रंथभेट योजनेसाठी सन - २०२३ या कॅलेंडर वर्षातील प्रकाशित ग्रंथ सादर करणेबाबत

राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान, कोलकाता यांच्या 'ग्रंथभेट' योजने अंतर्गत सन २०२३ या कॅलेंडर वर्षात प्रकाशित झालेली मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेतील ग्रंथ खरेदी करुन राज्यातील शासनमान्य ग्रंथालयांना भेट म्हणून देण्यात येतात.

या योजनेअंतर्गत खरेदी करण्यात येणाऱ्या ग्रंथांची निवड करण्यासाठी तसेच ग्रंथालय संचालनालय स्तरावरुन प्रसिध्द होणाऱ्या 'शासनमान्य ग्रंथ निवड यादी' मध्ये समावेश होण्याच्या दृष्टीने सन २०२३ या कॅलेंडर वर्षात ( **दि. १ जानेवारी, २०२३ ते दि. ३१ डिसेंबर, २०२३) प्रकाशित झालेल्या** व **प्रथम आवृत्ती** असलेल्या ग्रंथांची प्रत्येकी एक **एक विनामुल्य प्रत** (Complimentary copy) **ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडे दिनांक २८ फेब्रुवारी, २०२४ पर्यंत सादर करणे आवश्यक आहे. दि. २८ फेब्रुवारी, २०२४ नंतर प्राप्त झालेल्या ग्रंथांचा ग्रंथ निवड यादीसाठी विचार केला जाणार नाही. या योजनेसाठी सन २०२३ या वर्षात प्रकाशित झालेले ग्रंथ जर यापूर्वी संचालनालयास पाठविले असल्यास पुन्हा पाठविण्याची आवश्यकता नाही.**

तसेच, मुद्रण व नोंदणी अधिनियम, १८६७ अन्वये मुद्रकाने व ग्रंथ प्रदान अधिनियम, १९५४ अन्वये प्रकाशकाने सदर ग्रंथाची प्रत्येकी एक प्रत राज्य मध्यवर्ती ग्रंथालय, नगर भवन, मुंबई, शासकीय विभागीय ग्रंथालय, पुणे व शासकीय विभागीय ग्रंथालय, नागपूर येथे पाठविणे आवश्यक आहे. सदर ग्रंथ पोहोचल्याची पोच पावती संबंधीत ग्रंथालयांकडून घ्यावी. ग्रंथालय संचालनालयास संबंधित ग्रंथ पाठवितांना वरीलप्रमाणे ग्रंथ पाठविल्याची पोच पावती ग्रंथांसोबत टपालामार्फत वा समक्ष पाठविण्यात यावी. अधिक माहितीस्तव www.rrrf.gov.in हे संकेतस्थळ अवलोकावे.

**सदरचे निवेदन महाराष्ट्र शासनाच्या** www.maharashtra.gov.in **व ग्रंथालय संचालनालयाच्या** www.dol.maharashtra.gov.in **या संकेतस्थळांवर ठेवण्यात आले आहे.**

**(अशोक मा. गाडेकर)**
**प्र. ग्रंथालय संचालक**

Scanned with ACE Scanner